

रयत शिक्षण संस्थेचे,

डॉ.पतंगराव कदम महाविद्यालय,रामानंदनगर (बुर्ली)

# ता. पलूस, जि. सांगली

**राष्ट्रीय सेवा योजना** दिनांक: १९/०३/२०२१

## "आजादी का अमृत महोत्सव उपक्रम"

### कार्यक्रम अहवाल

महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या सूचनेनुसार व महाराष्ट्र शासनाच्या मुख्य सचिव, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे अ. शा. पत्र. क्र. संकीर्ण 8821 / प्र. क्र. 69 / सांका / 4 दि. 9 मार्च, 2021 रोजीच्या पत्रानुसार भारताच्या स्वातंत्र्याची 75 वर्ष पुर्ती निमित्त 'आजादी का अमृत महोत्सव' हा उपक्रम दि.१९/०३/२०२१ रोजी सकाळी 9:30 वाजता एन. एस. एस आणि इतिहास विभाग यांचे संयुक्त विद्यमाने घेण्यात आला. या कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते म्हनूण कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय तासगाव जि. सांगली येथिल प्रा. हेमंत लक्षमणराव कांबळे सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग हे उपस्थित होते. या वेळी बोलताना त्यांनी आपल्या भाषणात भारतातील ऐतिहासिक, ब्रिटिश आणि स्वातंत्र्योत्तर कालखंडातील शासन व्यवस्था, समाज व्यवस्था, देशसाठी जीवन बलिदान देणारे स्वातंत्र्यवीराचे योगदान, त्यानी केलेला त्याग, जनतेने सोसलेल्या हालअपेष्ठा केलेला संघर्ष, स्वातंत्र्याचे महत्व, आणि युवकांची भूमिका इत्यादी मुद्दे पकर्षाने मांड्ले. विद्यार्थी आणि त्यांची देशाच्याप्रती भावी नागरिक म्हणून असणारी जबाबदारी याचा उल्लेख केला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान महाविद्यालयाचे मा. प्राचार्य डॉ कदम एल. डी. यांनी भूषविले. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून स्वातंत्र्याची किंमत काय आहे याची जाणिव विध्यार्थ्यांना करुन दिली. स्वातंत्र्योत्तर युवकांची जबाबदारी यावर आपले विचार व्यक्त केले.

कार्यकर्माचे प्रास्ताविक व पाहुण्यांची ओळख इतिहास विभाग प्रमुख डॉ सोनवले आर. आर. यांनी करुन दिले. कार्यक्रमाचे आभार हिन्दी विभाग प्रमुख डॉ. भोसले के. बी. यांनी मांडले. सदर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. डॉ. खाडे ए. एस यांनी केले. कार्यकर्माचे संयोजन आणि नियोजन एन.एस.एस. आणि इतिहास विभागा मार्फत केले.

निष्पत्ती लाभार्थी संख्या : 75

- विद्यार्थ्यांना स्वातंत्र्यसंग्रामाची ओळख झाली.
- विद्यार्थ्यांमध्ये स्वातंत्र्योत्तर जबाबदारीची जाणिव निर्माण झाली.

DR. PATANGRAO KADAM MAHAVIDYALAYA RAMANANDNAGAR (BURLI)

राष्ट्रीय सेवा योजना

"आजादी का अमृत महोत्सव उपक्रम"

कार्यक्रमाची क्षणचित्रे



प्रमुख पाहुणे व मा.प्राचार्य प्रतिमा पूजन करताना



पाहुण्यांचे स्वागत करताना मा.प्राचार्य डॉ. कदम एल. डी॰



प्रमुख पाहुणे प्रा. कांबले एच. एल. आपले विचार व्यक्त करताना



अध्यक्ष मा.प्राचार्य डॉ. कदम एल. डी. मनोगत व्यक्त करताना

कार्यक्रम अधिकारी

एन.एस.एस विभाग

प्राचार्य,

डॉ.पतंगराव कदम महाविद्यालय,रामानंदनगर (बुर्ली)

DR. PATANGRAO KADAM MAHAVIDYALAYA RAMANANDNAGAR (BURLI)